

# गणिताशी करू गट्टी

**अभिषेक तेली**, रुईया कॉलेज
muntainbox@gmail.com

शाळेत असताना 'गणित' म्हटलं की अनेकांना घाम फुटतो; तर काहींसाठी 'गणित' म्हणजे सर्वाधिक गुणांची कमाई करून टक्केवारीचा आलेख वाढविण्याचा विषय असतो. असं चित्र शाळेत हमखास पाहायला मिळतं. पुढे कॉलेजची पायरी चढल्यावर अनेकांच्या मनात असलेली गणिताबद्दलची भीती आणखी वाढते. पण हाच विषय सोप्या आणि मजेशीर पद्धतीनं मांडण्याचा प्रयत्न **पोदार कॉलेजच्या** मॅथमॅट्रिक्स असोसिएशनच्या माध्यमातून होणाऱ्या 'मॅथमॅट्रिक्स २०२१' या आंतरमहाविद्यालयीन महोत्सवाच्या माध्यमातून होणार आहे. २७ ते २९ ऑगस्ट दरम्यान व्हर्च्युअल पद्धतीनं होणाऱ्या या फेस्टचा 'महाराष्ट्र टाइम्स' मीडिया पार्टनर आहे.



महाराष्ट्र टाइम्स
मीडिया पार्टनर

२०१३ पासून सुरू झालेल्या 'मॅथमॅट्रिक्स'चं यंदा ९वं वर्ष असून हा फेस्ट कॉलेजिअन्ससह शालेय विद्यार्थ्यांसाठीसुद्धा खुला असतो. यंदा महाराष्ट्रासह पंजाब, तामिळनाडू, आसाम, केरळ, उत्तर प्रदेश, दिल्ली या राज्यातील काही कॉलेजच्या विद्यार्थ्यांनीसुद्धा सहभाग नोंदवला आहे. आंतरमहाविद्यालयीन महोत्सवात 'ट्रेझर हंट' हा सर्व स्पर्धकांच्या आवडीचा इव्हेंट असतो. 'रेडर्स ऑफ द लॉस्ट आर्क' हा गणितावर आधारित ट्रेजर हंटचा इव्हेंट इथेही होणार आहे. यात फेसबुक, इंस्टाग्राम अशा सोशल मीडियाच्या वेगवेगळ्या माध्यमांवर गणिताशी संबंधित विविध कोडी पोस्ट केली जाणार आहेत आणि ती टप्प्याटप्प्याने सोडवून अंतिम लक्ष्यापर्यंत विद्यार्थ्यांना पोहोचायचं आहे. यासह द नॅचरल सस्पेक्ट्स, २००१ द मॅथ ओडिसी, द फास्ट अँड द फॅक्टोरियल, २०००० लॉगॅरिदम्स अंडर द सी हे गणिताशी संबंधित 'द बॅटल अगेंस्ट इग्नोरॅमस' या यंदाच्या थीमवर आधारित मजेशीर इव्हेंट्स होणार आहेत.

शुद्ध, उपयोजित गणिताशी संबंधित माहिती आणि इतर क्लिष्ट संकल्पना कशा सोडवायच्या याबाबत तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. स्पॉटीफायवर 'The Mathematrix Podcast' सर्च करून तुम्ही पॉडकास्टसुद्धा ऐकू शकतात. तसंच 'Mathematrix Podar' या युट्यूब चॅनलवर फेस्टच्या दिवसांमध्ये एक प्रदर्शन भरणार आहे. त्यामध्ये गणिताशी संबंधित विविध संकल्पना सोप्या आणि मजेशीर पद्धतीनं कशा सोडवायच्या या संबंधित व्हिडीओजदेखील अपलोड केले जाणार आहेत. उद्या संध्याकाळी ७ वाजता झूम ॲपच्या माध्यमातून व्हर्च्युअल पद्धतीनं 'मॅथमॅट्रिक्स'चे उद्घाटन होत असून त्यासाठी सीएफए आणि एमएस फायनान्स असणाऱ्या सेजल वोरा प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. तुम्हाला या फेस्टबद्दल काही शंका असल्यास तुम्ही mathematrixpodarofficial@gmail.com या ईमेल आयडीवर संपर्क साधू शकता.